सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ४९६ ठ. क्र. ५१ दि. १६/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहराची विकास नियंत्रण नियमावली २००४ साली मंजूर झालेली असून सदर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे सोलापूर शहरात गावठाण भाग वगळता सर्वत्र प्लॉट क्षेत्राच्या ५०% क्षेत्राचा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापरण्याचा अधिकारी प्राप्त होता. त्या नियमाप्रमाणे सोलापूर महानगरपालीकेस ब-याच आरक्षित जागा विनामोबदला ताब्यात मिळालेल्या असून शहराच्या गरजा भागवण्यासाठी त्याचा उपयोग होणार आहे.

शासनाच्या दि. २०/०१/२०१६ रोजीच्या निर्णयामुळे सदर हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापरण्यावर बरीच बंधने आलेली आहेत. नवीन नियमाप्रमाणे ६ मीटर व ७.५ मीटर रुंदीच्या रस्त्यावर हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापराण्यास पूर्णत: बंदी आणलेली आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांचे नुकसार होणार आहे. नवीन (TDR) धोरण हे मोठया बिल्डांच्या भल्यासाठी जाहीर करण्यात आलेले असून त्यातुन मुबंई व नागपूर या दोन शहरांना वगळण्यात आले आहे.

नविन नियमाची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले असून या आदेशानुसार पुर्वी देण्यात आलेले हस्तांतरणीय विकास हक्क दाखल्यातील (DRC) क्षेत्राचा वापर करताना नविन नियम लागु करण्याबाबत यात तरतुद आहे.

नविन TDR धोरण स्वीकारल्यास छोटया जागा मालकांचा व लहान रस्त्यावरील मालकांचे नुकसान होणार असून ही सभा या नविन TDR धोरण लागु न करण्याबाबतचा ठराव करीत आहे. तसेच पूर्वी दिलेले TDR दाखल्यातील शिल्लक TDR पूर्वीच्या नियमाप्रमाणे वापरण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महाराष्ट्र शासनास विनंती करण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्रासंगिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.४१९ ठ. क्र. ४२
दि. २६/५/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



मा.केंद्र शासन व मा.राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीचे वर्ष विविध उपक्रमांनी व विकास कामे करुन समाजातील सर्व सामाजिक,शैक्षणिक कार्य करणा-या लोकांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून अत्यंत चांगल्या पध्दतीने नियोजन करणे, व्याख्यानमालेद्वारे जनजागृती करणे,डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोलापूर येथे आले होते तेंव्हा त्यांच्या वास्तव्याने पावन झालेल्या ऐतिहासिक वास्तुत संग्रहालय निर्माण करणे् वगैरे स्तुत्य उपक्रम करुन महानगरपालिकेचे वतीने जयंती वर्ष साजरे करणेकरिता आर्थिक तरतुद करणे् या कार्यक्रमासाठी येणारे खर्चास मान्यता देणेत येत असून, सदरचे कार्यक्रम वर्षभर राबविणेच्या दृष्टीकोनातून कमिटी नियुक्त करणे जरुर ती सर्व कार्यवाही करणेकामी मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

याकामी खालीलप्रमाणे समिती नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) मा. महापौर
२) मा. उपमहापौर
३) मा. अध्यक्ष, स्थायी समिती
४) मा. अध्यक्ष, परिवहन समिती
५) मा. सभागृह नेता - कन्वेनर
६) मा. विरोधी पक्षनेता
७) मा. गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस
८) मा. गटनेता शिवसेना
९) मा. गटनेता ब.स.पा/मा.क.पा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ७२० ठ. क्र. ७३ दि. १५/५/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर येथील सिध्देश्वर पेठ उर्दू शाळा नं. १ च्या जवळ होणा-या मिनी शॉपिंग सेंटरला **मरहुम बाबूमियाँ हत्तूरे** असे नामकरण करणेस सदर ठिकाणी नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा.नामाविधान समितीने निर्णय घ्यावा.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका